प्रेस नोट दिनांक - २३/०३/२०१९

---

वाकडी जळगाव येथे खुन करुन पळालेला आरोपी गुन्हे शाखा युनिट - ३ कडुन जेरबंद

---

पहुर पोलीस स्टेशन जिल्हा – जळगाव गुरनं – ३४/२०१९ भा दं वि ३०२, ३६३, ३६४, १२० ब, ३४१ सह ॲट्रासिटी ॲक्ट कलम ३ (२) (५) हा गुन्हा दिनांक – २३/०३/२०१९ रोजी दाखल आहे. त्यामधील मुख्य आरोपी स्वप्निल किशोर जोशी वय – २७ रा – गोल्डन पटेल सोसायटी कर्वेनगर पुणे व त्याचे इतर साथीदार यांनी यातील फिर्यादी राजेंद्र ऊर्फ राजु लक्ष्मण चांदणे वय-३० रा – पेंटर रा - वाकडी ता – जामनेर जिल्हा जळगाव यांचा भाऊ विनोद चांदणे हा ग्रामपंचायत सदस्य आहे व तो वाकडी गावामधील ग्राम पंचायत मध्ये चालु असलेल्या गैरव्यवहारास विरोध करतो तसेच मागासवर्ग समाजातील असुन सर्वांना विरोध करतो या कारणावरुन यातील आरोपी यांनी संगणमत करुन त्यास ठार मारण्यासाठी सुपारी देवुन कट रचुन विनोद चांदणे याचे अपहरण करुन त्यास ठार मारले आहे. त्याबाबत वरील प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

सदर बाबत दिनांक – १९/०३/२०१९ रोजी फिर्यादी यांचे भाऊ यांना विजय चांदणे यांनी पहुर पोलीस स्टेशन येथे विनोद चांदणे हा मिसिंग असल्याबाबत खबर दिल्याने मिसिंग रजिस्टर नंबर – ११/२०१९ प्रमाणे दाखल आहे. तपासात वरीलप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

यातील आरोपीबाबत मिळालेल्या माहीती वरुन गुन्हे शाखा युनिट ३ पुणे व पहुर पोलीस स्टेशन पुणे येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी वारजे माळवाडी , कर्वे नगर, कोथरुड या भागात बारकाईने कसुन सखोल तपास केला व खब-याकडुन माहीती काढुन मिळालेल्या माहीतीवरुन यातील संशयीत इसम स्वप्निल किशोर जोशी वय – २७ रा – गोल्डन पटेल सोसायटी कर्वेनगर पुणे यास वारजे माळवाडी पुणे भागात सापळा लावुन पकडले आहे व त्यास पुढील कारवाईसाठी पहुर पोलीस स्टेशन जळगाव यांचे ताब्यात देण्यात आलेले आहे.

सदरची कामगिरी श्री. शिरीष सरदेशपांडे पोलीस उप आयुक्त गुन्हे शाखा पुणे शहर, श्री. समीर शेख सहायक पोलीस आयुक्त गुन्हे - १ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट ३ चे पोलीस निरीक्षक दिपक निकम व पोलीस उप निरीक्षक संजय गायकवाड, अजय म्हेत्रे, किरण अडागळे आणि गुन्हे शाखा युनिट तीन पथकातील पोलीस कर्मचारी सपौफो दत्तात्रय गरुड, गजानन गानबोटे, मच्छिंद्र वाळके, प्रविण तापकीर, सचिन गायकवाड, राहुल घाडगे ,सुजीत पवार, यांनी केलेली आहे.